दैनिक

अन्यायाचा प्रतिकार | महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

# रायगड नगरी

मुख्य संपादक : सुनिल पोतदार

• वर्ष १६ वे • अंक ४३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शुक्रवार दि.७ मे २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

## पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अथक प्रयत्नांनी जिल्ह्यातील

# आरोग्य संस्थाच्या बळकटीकरणासाठी शासनाकडून १०६.१५ कोटी रक्कमेचा निधी मंजूर

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

जिल्ह्याच्या पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या अथक प्रयत्नांनी जिल्ह्यातील आरोग्य संस्थाच्या बळकटीकरणासाठी विविध आरोग्यविषयक कामांकरीता शासनाने एकूण रू. १०६.१५ कोटी रक्कमेचा भरीव निधी मंजूर केला आहे.

या प्राप्त झालेल्या निधीमुळे रायगड जिल्ह्यातील जनतेस अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध होण्यास निश्चितच मदत मिळणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत वेळोवेळी नवीन आरोग्य संस्था स्थापनेस तसेच श्रेणीवर्धनास मान्यता देण्यात आलेली आहे. या आरोग्य संस्था कार्यन्वित होण्याकरीता त्यांचे विहित कालावधीत बांधकाम पूर्ण होऊन जनतेस आरोग्य सुविधा उपलब्ध होणे आवश्यक आहे. तसेच सद्यस्थितीत असलेल्या कोविड-१९ या संसर्गजन्य आजाराच्या अनुषंगाने उपचारात आवश्यक बदल व अत्याधुनिक सुविधांकरीता निधीची आवश्यकता असल्याने आशियाई विकास बँकेकडून कर्ज मंजूरीच्या प्रस्तावावर दि.०८ मार्च, २०२१ रोजी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे. यानुसार बांधकाम, यंत्रसामुग्री, उपकरणे तसेच मनुष्यबळ उपलब्ध करण्याकरीता राज्य शासनाकडून मागणीपेक्षा कमी प्रमाणात निधी मिळत असल्याने, राज्यातील आरोग्य संस्थांकरीता आवश्यक असलेले रु. ७ हजार ४६७ कोटी (९९५.४६६६ मिलियन यू.एस डॉलर) किंमतीपैकी आशियाई विकास बँकेकडून रु.५ हजार १७७ कोटी (७०%) इतके कर्ज घेण्यात येणार असून राज्य हिश्याचे रु.२ हजार २९० कोटी (३०%) इतक्या रकमेचे अनुदान उपलब्ध करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

**जिल्ह्यातील स्त्री रूग्णालयासाठी रू.७० कोटी, महाड येथील ट्रॉमा केअर युनिटसाठी रू.१७ कोटी, विरजोली ता. रोहा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रू. ९ कोटी, मौजे परसुले, ता. पोलादपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी रू. ९ कोटी, मौजे जिते, ता.कर्जत येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रासाठी रू. १ कोटी १५ लक्ष इतकी रक्कम मंजूर करण्यात आली आहे.**



## खालापूरजवळ ट्रकची कारला धडक; २ ठार १ जखमी



**दै.रायगड नगरी । खोपोली**

जुन्या मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्गावर ट्रकने कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. तर एकजण जखमी झाला आहे. ट्रकचे ब्रेक फेल झाल्याने खालापूर तालुक्यातील शिळफाटानजीक पटेलनगर येथे ही दुर्घटना घडली.

अपघातग्रस्त ट्रक पुण्याहून मुंबईकडे सिमेंट घेऊन चालला होता. सकाळी आठ वाजण्याच्या सुमारास एक्सप्रेस वेवरील खोपोली एक्झिटवरुन जुन्या महामार्गाने खोपोलीकडे जात असताना, शिळफाटानजीक पटेल नगर येथील उतारावर ट्रकचे ब्रेक फेल झाले. ही बाब लक्षात आल्यानंतर ट्रकचालकाने ट्रकमधून उडी मारली. त्यामुळे हा ट्रक समोरुन येणाऱ्या कारवर धडकून पलटी झाला.

ट्रकचालकाने गाडीतून उडी मारली, मात्र तो वाचू शकला नाही. त्याच्यासह एका पादचाऱ्याचा या अपघातात मृत्यू झाला असून, ट्रकचा क्लीनर जखमी झाला आहे.

## मुंबईत एटीएसकडून ज्वालाग्राही युरेनियमचा साठा जप्त

**दै.रायगड नगरी । मुंबई**

**अँटिलियासमोर सापडलेल्या स्फोटकांचं प्रकरण ताजं असतानाच आता अणुबॉम्बसाठी वापरल्या जाणाऱ्या अत्यंत ज्वालाग्राही अशा युरेनियमचा मोठा साठा मुंबईत जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र एटीएसनं बुधवारी ही कारवाई केली असून या प्रकरणी दोघांना अटक करण्यात आली आहे.**

जप्त करण्यात आलेले युरेनियम सात किलोपेक्षा जास्त असून बाजारात त्याची किंमत २१ कोटी ३० लाख रुपये इतकी आहे. स्फोटके बाळगणाऱ्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. जिगर पांड्या आणि अबू ताहिर अशी त्यांची नावं आहेत. या दोघांनाही १२ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे.

ठाण्यात राहणारा जिगर पांड्या हा युरेनियम विकण्याच्या प्रयत्नात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीच्या आधारे एटीसच्या नागपाडा युनिटने सापळा रचून जिगरला अटक केली.

मानखुर्द येथे राहणाऱ्या अबू ताहिरकडून त्याला युरेनियम मिळाले असल्याची माहिती चौकशीतून समोर आली. त्यानंतर लगेचच पोलिसांनी अबू ताहिरच्या मुसक्या आवळल्या. त्यानं दिलेल्या माहितीवरून पोलिसांनी काल युरेनियमचा मोठा साठा जप्त केला. इतक्या मोठ्या प्रमाणात युरेनियम कशासाठी आणले गेले होते, याचा तपास एटीएसकडून तपास सुरू करण्यात आला आहे.

युरेनियमचा साठा तपासणीसाठी भाभा अणुशक्ती केंद्रात पाठविण्यात आला होता. बीएआरसीकडून मिळालेल्या माहितीनुसार, हे युरेनियम अत्यंत घातक आहे. पांड्या आणि ताहिर या दोघांवर ॲटोमिक एनर्जी ॲक्ट १९६२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## संक्षिप्त...

### बदलापुरात शनिवारपासून कडक लॉकडाऊन

**दै.रायगड नगरी । बदलापूर**

करोना रुग्णांची वाढती संख्या आणि त्यामुळे आरोग्य व्यवस्थेची बिकट स्थिती निर्माण झाल्याने अनेक ठिकाणी संपूर्ण लॉकडाऊनचा निर्णय घेतला जात आहे. मुंबईजवळील बदलापूर शहरातही स्थानिक प्रशासनाने लॉकडाऊनची घोषणा केली आहे.

करोना संसर्गाची साखळी तोडण्यासाठी येत्या शनिवारपासून कडक लॉकडाऊन लावण्याचा निर्णय बदलापूर नगरपरिषदेनं घेतला आहे. आमदार किसन कथोरे यांच्या बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला. शहरात सात दिवसांसाठी हा लॉकडाऊन असणार आहे.

करोना प्रादुर्भाव रोखण्यासाठी करण्यात आलेल्या या लॉकडाऊनमध्ये नागरिकांच्या हालचालींवर निर्बंध घालण्यात येणार आहेत. शहरातील नागरिकांना अत्यावश्यक कारणाव्यतिरिक्त घराबाहेर पडता येणार नाही. तसंच अत्यावश्यक सेवा पुरवणारी दुकानेच या काळात सुरू राहतील. निर्बंधांचं उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाण्याची शक्यता आहे.

करोनाच्या दुसऱ्या लाटेने धडक देऊन अनेक दिवस लोटल्यानंतरही आरोग्य व्यवस्थेची स्थिती सुधारलेली नाही. त्यामुळे सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यासह अन्य काही ठिकाणीही कडक लॉकडाऊनचा निर्णय घेण्यात आला आहे.

## पनवेल तालुका पोलिसांच्या कारवाईमध्ये देशी मद्यसाठा हस्तगत

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलिसांनी तालुक्यातील दुंदरे, बारवई-पोयंजे, ठोंबरेवाडी, चिखले गाव आदी परिसरात वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र दौंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली वेगवेगळ्या पथकाने टाकलेल्या छाप्यात मोठ्या प्रमाणात देशी मद्यसाठा हस्तगत करण्यात आला आहे.

तालुक्यातील दुंदरे या ठिकाणी एका इसमाकडे गावठी दारु मिळून आली आहे. तर पोयंजे समता नगर बारवई या ठिकाणी दोघा जणांनी मिळून त्यांच्याकडे देशी दारुचा साठा करून तो पान पटरीजवळून विकत असल्याची माहिती मिळाल्याने त्यांच्यावर सुद्धा कारवाई करून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. ठोंबरेवाडी येथे सुद्धा विना परवाना देशी दारु बेकायदेशीररित्या ताब्यात ठेवून त्याची विक्री करण्यासाठी जवळ बाळगीत असल्याप्रकरणी त्याच्याकडून हजारो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. चिखले गाव येथे सुद्धा विना परवाना देशी दारु जवळ बाळगल्याप्रकरणी एका इसमाला ताब्यात घेवून त्याच्याकडून हजारो रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

## पनवेल महापालिकेच्या शासकिय लसीकरण केंद्रांमध्ये वाढ

### टाटा हॉस्पीटल आणि खांदा कॉलनी ही दोन नवीन लसीकरण केंद्रे सुरू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल महानगरपालिका कार्यक्षेत्रात ४५ वर्षांवरील नागरिकांना विशेषत्वाने जेष्ठ नागरिकांसाठी पालिकने दोन नवीन लसीकरण केंद्रे सुरू केली आहेत. टाटा हॉस्पीटल, खारघर येथे पहिले एक शासकीय लसीकरण केंद्र होते त्यामध्ये वाढ करत आणखी एक लसीकरण केंद्र याठिकाणी सुरू करण्यात आले आहे. तसेच खांदा कॉलनी येथील रोटरी क्लब याठिकाणी नव्याने शासकीय आरोग्य उपकेंद्र लसीकरणासाठी सुरू करण्यात आले आहे.



४५ वर्षापेक्षा अधिक वयाच्या नागरिकांना कोविशिल्ड लसींचा दुसरा डोस सध्या पालिका क्षेत्रातील आठ शासकिय लसीकरण केंद्रावर सुरू करण्यात आला असून. दिनांक ६ पासून पुढील आदेश होईपर्यंत हे लसीकरण सुरू असणार आहे. सकाळी प्रत्येक केंद्रावर २०० टोकन देण्यात येत आहेत. दुसरा डोस घेण्यास येणाऱ्या नागरिकांनी पहिला डोस घेतल्याचे प्रमाणपत्र अथवा पहिला डोस घेतल्यानंतर प्राप्त झालेला एसएमएस सोबत राखणे बंधनकारक असणार आहे. अशा एकुण आठ शासकिय केंद्रावर ४५ वर्षावरील अधिक वयाच्या नागरिकांना कोविशिल्ड लसीचा दुसरा डोस देण्यात आहे. यामध्ये टाटा हॉस्पीटल येथे दोन, खांदा कॉलनी येथील रोटरी क्लब आरोग्य उपकेंद्र, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र २ कोळीवाडा पनवेल, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ४ कळंबोली, नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र ६ कामोठे, ओएनजीसी हॉस्पीटल, पनवेल, रेल्वे हॉस्पीटल, रेल्वे स्टेशन, पनवेल यांचा समावेश आहे. जो पर्यंत लसींचा साठा उपलब्ध आहे तो पर्यंत हे लसीकरण चालू राहील. भविष्यात जसा लसींचा साठा उपलब्ध होईल त्या प्रमाणात लसीकरण केंद्र संख्येमध्ये वाढ किंवा घट करणे याबाबत कार्यवाही केली जाईल.

याशिवाय १८-४४ वयोगटातील नागरिकांना कोविन ॲप् वर नोंदणी झालेल्या व लसीकरणाची दिनांक आणि वेळ निश्चित केलेल्या नागरिकांना कोविशिल्डचा पहिला डोस देण्याचे कामही चालूच आहे.

## सुधागडात दुर्मीळ वन्यजीवांची तस्करी करणाऱ्या तस्करांचा सुळसुळाट

# खवल्या मांजर व पिल्लांची तस्करी करणारे चार आरोपी गजाआड



**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

सुधागड तालुक्यात अंधश्रध्दा, काळीजादू, व औषधासाठी दुर्मीळ वन्यजिवांची तस्करी करणाऱ्या तस्करांचा सुळसुळाट झाल्याचे समोर आले आहे. गुरुवारी दि.(०६) रोजी पाली वनविभागाने खवल्या मांजराची तस्करी करणाऱ्या तस्करास पकडले. या गुन्ह्यात चार आरोपीना वनविभागाने अटक केली असून त्यांच्याजवळील मुद्देमाल जप्त केला आहे.

सुधागड वनविभागाला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार उपवनसंरक्षक आशिष ठाकरे व सहाय्य क वनरक्षक संजय कदम यांचे मार्गदर्शनाखाली सुधागड वनपरिक्षेत्र अधिकारी समीर शिंदे व कर्मचारी यांनी सापळा रचून ही कारवाई केली. नाडसुर ते जांभुळ पाडा रोडवर दोन संशयित मोटारसायकल थांबवून मोटारसायलस्वार इसम यांची चौकशी केली असता अनिल भागू वाघमारे यांचे पाठीवर असलेली बॅग तपासली असता बॅग मध्ये झाकून ठेवलेले खवल्या मांजर आढळून आले.वन्यजीव संरक्षण अधिनियम १९७२ च्या अनुसूचि १ मधील वन्यजीव खवले मांजर व १ पिल्लू वनविभागाने जप्त केले. ..../२

## उरण तालुक्यात महसूल खात्याचे नियम तुडवले जात आहेत पायदळी

### वेश्री परिसरात रात्री तिवरांवर भराव ; प्रशासन मात्र सुस्त



**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यात महसूल खात्याचे नियम पायदळी तुडविले जात असून, रात्रीच्या अंधाराचा फायद घेत उरण तालुक्यातील वेश्री ग्रामपंचायतीतील बैलदौंडाखार हद्दीतील एका समुद्री नाल्याच्या बाजूला असलेल्या जमिनीवर भराव करतांना त्या ठिकाणी असलेल्या तिवरांवरही मोठ्या प्रमाणात भराव केला जात आहे. विशेषत: रात्रीच्या अंधारात हा सर्व गैरप्रकार चालत असल्याचे समोर येत आहे.

उरण तालुक्यात महसूल खात्याचे नियम जणू काही पायदळी तुडविण्यासाठीच बनले आहेत. येथील अनेक कंटेनर गोदाम साकारतांना पावसाच्या पाण्याचा निचरा,त्याच प्रमाणे नाल्यांवर अतिक्रमणे झालेली आहेत. तर अनेक कंपन्यांनी आपाल्या कंपनीच्या पाठीमागील असलेल्या शेतकऱ्यांना शेतीवर जाण्यासाठी ट्रॅक्टर नेण्यासाठी, वाहन नेण्यासाठी पुरेशी रस्ताच ठेवलेली दिसत नाही.

मात्र त्याबाबत आजतागायत कोणताही तोडगा निघालेला नाही त्यामुळे शेकडो शेतकऱ्यांना आपल्या शेतीवर जाण्यासाठी नाहक अनेक किलोमीटर चा वळसा घालून शेतीवर जावे लागत आहे. मात्र प्रशासनाला याबाबत काहीही देणेघेणेच नसल्याचे वारंवार सिद्ध झाले आहे. कंपनी वाल्याचे हात एवढे लांब आहेत की त्यांच्यापुढे शेतकरी मात्र फारच लहान ठरत आहेत. ही सर्व वस्तुस्थिती पाहता वेश्री परिसरात ही अशाच प्रकारे शासकीय नियम धाब्यावर मारले जात आहेत.

या विभागातील अनेक सरकारी जमिनींवर अतिक्रमणे झाल्याच्या वंदता असतानाच आता चिर्ले गाव परिसरातील समुद्री नाल्याच्या कडेला असलेल्या तिवरांचा खुलेआम पणे जीव घेतला जात आहे. या ठिकाणी असलेल्या तिवरांच्या झाडांवर ही भरावाची माती ..../२

## रायगडला ६१ हजार २०० लसींचा पुरवठा : डॉ.किरण पाटील

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

रायगड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात कोरोना लसीकरण सुरु असून, जिल्ह्यासाठी ६१ हजार २०० कोविशिल्ड व कोवॅक्सिन लसींचा साठा उपलब्ध झाला आहे. यामध्ये १६ हजार कोवॅक्सिन लस असून, यामधून १८ ते ४४ वर्षांपर्यंतच्या नागरिकांचे लसीकरण करण्यात येईल. तर ४५ हजार २०० कोविशिल्ड लस असून, यामधून ४५ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली.

जिल्ह्यातील अलिबाग येथील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय माणगाव, रोहा, कर्जत, पेण, कर्जत व ग्रामीण रुग्णालय उरण, महाड या ८ रुग्णालयांमध्ये १८ ते ४४ वर्षांपर्यंतच्या नागरिकांचे कोरोना लसीकरण केंद्र सुरु करण्यात आले आहे. जिल्ह्यासाठी १६ हजार कोवॅक्सिन लस उपलब्ध झाल्या आहेत. त्यांचे उपजिल्हा रुग्णालय माणगाव, रोहा, कर्जत व ग्रामीण रुग्णालय उरण, महाड या ५ रुग्णालयांमध्ये प्रती केंद्र ३ हजार २०० लासींचे वाटप करण्यात आले आहे.

**जिल्ह्याला मिळालेल्या ४५ हजार २०० कोविशिल्ड लसींपैकी ११ हजार ३०० लसी पनवेल महानगर पालिकेला देण्यात आल्या आहेत. तर जिल्ह्यातील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालये व ग्रामीण रुग्णालयांना ११ हजार ३०० लसींचे वितरण करण्यात आले. तर उर्वरित २२ हजार ६०० लसींचे जिल्हाभरातील ५२ प्राथमिक आरोग्य केंद्र व त्यांच्या अखत्यारीतील निवडक उपकेंद्र यामध्ये वाटप करण्यात आले आहे.**




तर यापूर्वी जिल्ह्याला १८ ते ४४ वर्षापर्यंतच्या नागरिकांच्या लासीकरणासाठी मिळालेल्या १० हजार कोविशिल्ड लसींचे अलिबाग येथील जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय पेण, पनवेल यांना वाटप करण्यात आले आहे. १४ ते ४४ वर्षांपर्यंतच्या ..../२

# दिलासा आणि आधार द्या

सर्वोच्च न्यायालयाच्या घटनापीठाने महाराष्ट्र सरकारने मराठा समाजाला दिलेले शैक्षणिक; तसेच नोकऱ्यांमधील आरक्षण घटनाबाह्य ठरवून रद्दबातल केल्यामुळे, आधीच अनेक समस्यांमध्ये गुरफटलेल्या राज्यापुढे एक गंभीर आणि अतिशय संवेदनशील पेच उभा राहिला आहे. या पेचावर सर्वसहमतीने, केंद्र सरकारला समवेत घेऊन आणि सत्ताधारी व विरोधकांनी संवाद साधून मार्ग काढावा लागणार आहे; मात्र या निकालानंतर महाराष्ट्रातील सत्ताधारी व विरोधक यांनी परस्परांवर जी चिखलफेक सुरू केली आहे, ती उबग आणणारी आहे. मुख्य म्हणजे, या कलहातून या निकालाकडे डोळे लावून बसलेल्या आणि निकालानंतर निराश झालेल्या मराठा तरुण-तरुणींच्या पदरात काहीही पडणार नाही. आता प्रयत्न त्यासाठी करायला हवेत. सर्वोच्च न्यायालयाचे निकालपत्र शेकडो पानांचे आहे आणि ते सविस्तर वाचले गेल्यावर अनेक बाबींवर प्रकाश पडेल. महाराष्ट्र सरकारने नेमलेल्या न्या. एम. जी. गायकवाड यांचा 'मराठा समाजाला शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या मागास' ठरविणारा अहवाल घटनापीठाने अमान्य केला आहे. घटनापीठाने या निकालात दुसऱ्या एका तांत्रिक बाबीवर बोट ठेवले आहे. ते जास्त महत्त्वाचे आहे. कोणत्याही परिस्थितीत आरक्षणाची टक्केवारी पन्नास टक्क्यांच्यावर जाता कामा नये, असा ऐतिहासिक निकाल इंद्रा साहनी प्रकरणात १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयाच्या मोठ्या घटनापीठाने दिला होता. हा दंडक मराठा आरक्षण प्रकरणात बाजूला ठेवण्यासारखे काहीही झालेले नाही, असे आत्ताच्या घटनापीठाने म्हटले आहे. याचा एक अर्थ असा होतो, की सध्याच्या आरक्षणाच्या व्यवस्थेतच मराठा समाजालाही सामावून घ्यावे लागेल. अशा सामिलीकरणास सध्या आरक्षण मिळणारे इतर समाज मान्यता देणार नाहीत, हे तर उघडच आहे. मराठा समाजाने गेली अनेक वर्षे हा लढा अतिशय शांततेने आणि प्रगल्भतेने लढला आहे. दुर्दैवाने, आजवर पन्नासहून अधिक मराठा तरुणांनी यासाठी आत्माहुती दिली आहे. एखाद्या समाजाच्या भावना जेव्हा इतक्या तीव्र असतात तेव्हा न्यायपालिका, संसद व विधिमंडळे आणि एकूण समाजाने अशा विषयांचा 'राजकीय खेळ' न होता मार्ग काढायचा असतो. 'ज्या समाजातील ८० ते ८५ टक्के लोकसंख्या अविकसित, मागास किंवा अप्रगतच असते; त्या समाजात आरक्षणाची मर्यादा ५० टक्केच असावी, हा तरी आग्रह कशासाठी,' असा प्रश्न याआधी अनेकांनी उपस्थित केला आहे. या प्रश्नात तथ्यही आहे. या पार्श्वभूमीवर, महाराष्ट्र सरकारच्या हातात फेरविचार याचिका दाखल करण्याचा एक पर्याय आहे; मात्र अशी याचिका केली तर ती अतिशय तयारीने करावी लागेल आणि प्रसंगी राज्यघटनेतील अनेक तरतुदींचे फेरपरीक्षण करायला लावणारी असावी लागेल. आज देशात तमिळनाडूसहित अनेक राज्यांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५०च्या पुढे जाणारी आहे. तमिळनाडूतील ६९ टक्के आरक्षण हे भारतीय राज्यघटनेच्या नवव्या सूचीत टाकून संरक्षित करण्यात आले आहे. तमिळनाडूच्या तत्कालीन मुख्यमंत्री जे. जयललिता यांनी केंद्र सरकारवर दडपण आणून ही घटनादुरुस्ती करायला लावली होती. आताही केंद्र सरकारने हा पर्याय महाराष्ट्राबाबत विचारात घ्यायला हवा. तसे करताना सर्वांना सोबत घ्यायला हवे. या विषयाचे राजकारण करण्याऐवजी प्रवेश आणि नोकऱ्या मिळवू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींना कसा आधार देता येईल, याचा विचार आता प्राधान्याने करायला हवा. महाराष्ट्रातल्या मराठा समाजातील शिक्षणसम्राट आणि सहकारसम्राटांनी याबाबत आजवर चाकोरीबाहेरचा विचार करण्याचे टाळले आहे. आता तरी त्यांनी तसे करू नये. मराठा समाजाची रचना, त्यातले पोटभेद, आर्थिक दरी यांबाबत पुष्कळ लिहिले, बोलले गेले आहे. आज महाराष्ट्राच्या गावोगावी पसरलेल्या, जमिनीचा आधार तुटत गेलेल्या आणि हातात निव्वळ पदव्यांची भेंडोळी घेऊन फिरणाऱ्या मराठा तरुण-तरुणींना भक्कम मानसिक आधार द्यायला हवा. सर्वोच्च न्यायालयाने काहीही निकाल दिला असला, तरी आम्ही तुम्हाला वाऱ्यावर सोडणार नाही; तुमच्यासोबत आम्ही आहोत, असे सर्व पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येऊन म्हणण्याची गरज आहे. तेवढी परिपक्वता एकही नेता दाखवायला तयार नाही. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केंद्र सरकारला या विषयात तातडीने लक्ष घालण्याची विनंती केली आहे. ती उचित आहे. आता केंद्र आणि राज्य सरकार यांनी एकत्र आल्याशिवाय मार्ग निघणार नाही. काही जण केंद्र सरकारनेच नवा मागासवर्ग आयोग नेमावा, असे सुचवत आहेत. हा मार्ग स्वीकारता कामा नये. आधीच या प्रकरणात प्रचंड काळ गेला आहे. कोणतेही नवे आयोग म्हणजे नवा विलंब. तो टाळायला हवा. ओबीसी आरक्षण विरुद्ध मराठा आरक्षण असाही वाद नव्याने होता कामा नये. मुख्यमंत्र्यांनी पहिली पायरी म्हणून महाराष्ट्रातील सर्वपक्षीय नेत्यांची समिती तयार करावी आणि या समितीने तातडीने पंतप्रधानांची भेट घेऊन मार्ग काढण्याची विनंती करावी. आरोप-प्रत्यारोप करण्याची ही वेळ नाही. उद्विग्न झालेल्या मराठा समाजाला दिलासा आणि हात देण्याची आहे.

# श्रीवर्धन तालुक्यात आंबा उत्पन्नाच्या प्रमाणात मोठी घट ; बागायतदार व व्यापारी नुकसानामध्ये

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**




श्रीवर्धन तालुक्यातून दरवर्षी नवी मुंबई येथील वाशी मार्केटमध्ये आंब्याचे लाखापेक्षा जास्त बॉक्स पाठवले जातात. श्रीवर्धन तालुक्यात हरिहरेश्वर,बागमांडले, कोलमंडले, रानवली, निगडी, सायगाव, निवळे, चिखलप, शिरवणे, दांडगुरी या परिसरामध्ये हापूस आंब्याच्या खूप मोठ्या प्रमाणावरती बागा आहेत. श्रीवर्धन तालुक्यातील आंबा बागायतदार आंबा लवकर तयार होण्यासाठी किंवा पिकण्यासाठी कोणत्याही प्रकारची कृत्रिम औषधे, इंजेक्शन, कलटार वापरत नाहीत. त्यामुळे इतरांपेक्षा श्रीवर्धनच्या हापूस आंब्याची चव खूपच चविष्ट असते. आंब्याचे उत्पन्न कमी होण्यामागचे प्रमुख कारण मागील वर्षी जून महिन्यात आलेले निसर्ग चक्रीवादळ हे आहे. चक्रीवादळा मध्ये श्रीवर्धन तालुक्यातील ५०% हापूस आंब्याची झाडे उन्मळून पडली आहेत. तर जी झाडे उभी आहेत त्यांच्या फांद्या तुटून पडल्यामुळे यावर्षी आंब्याच्या झाडांना मोहोर आलेला नाही. जी हापूस आंब्याची झाडे सुस्थितीत आहेत त्यांना देखील खराब हवामानाचा फटका बसून त्यांना देखील आलेला मोहर गळून पडला आहे. ज्या आंब्याच्या झाडांना मोहर फुटला होता तो मोहर चांगला फळावा याकरता बागायतदारांनी त्यावरती फवारणीसाठी देखील मोठ्या प्रमाणावर खर्च केला. परंतु अखेर खराब हवामानामुळे मोहोर गळुन पडल्यामुळे बागायतदारांचे खूप मोठे नुकसान झाले आहे.

मे महिन्याची पाच तारीख होऊन गेले तरी अद्याप श्रीवर्धन बाजारपेठेत कुठे ही आंबा विकायला आलेला दिसत नाही. इतर वेळेला मे महिना सुरू होण्याच्या अगोदरच श्रीवर्धन बाजारपेठ हापूस आंब्याने फुलून गेलेली पाहायला मिळते. आंब्याच्या उत्पन्नात घट झाल्यामुळे यावर्षी बागायतदार व आंबा व्यापारी यांचे देखील खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होणार आहे. वादळानंतर बागायतदारांना नुकसानभरपाई मिळाली असली तरी नुकसान भरपाईच्या रकमे एवढे उत्पन्न एक आंब्याचे झाड देते. म्हणजेच आंबा बागायतदार ९९ टक्के नुकसानात असल्याचे दिसून येत आहे.

# रोहा तालुक्यात आंतरजिल्हा बदलीवरून आलेला शिक्षक चार वर्षे गायब!

## रोहा शिक्षण विभागाचा कारभार आहे तरी कसा? ग्रामस्थांचा एकच संताप!

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**



रोहा तालुक्यात रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेवर आंतरजिल्हा बदलीवरून आलेल्या शिक्षक कर्मचाऱ्याने केवळ दहा ते पंधरा दिवस हजेरी लावली तद्नंत तब्बल चार वर्षाहून अधिक काळ ते गैर हजर असून गायब आहेत.याचा तपास आजतागत रोहा पंचायत समिती शिक्षण व जिल्हा परिषद शिक्षण विभागाला आहे की नाही? असा सवाल येथील ग्रामस्थ व शाळा व्यवस्थापन समितीच्या समोर उभा झाला असून याबाबत संताप व्यक्त केला जात आहे.

या बाबत सविस्तर माहिती अशी की रायगड जिल्हा परिषद शाळा धानकान्हे आदिवासी वाडी या ठिकाणी ३० ते ३५ विद्यार्थी येथील शाळेत शिक्षण घेत आहेत एवढी पटसंख्या असून देखील संबधित शाळेत एकच शिक्षक हजर असून बदलीवर आलेले शिक्षक गेली चार वर्षे पेक्षा अधिक काळ गैरहजर आहे. त्यामुळे पहिली ते चौथीच्या वर्गाच्या विद्यार्थ्यांचा भार हा केवळ एकच शिक्षकावर असल्याने विद्यार्थ्यांच्या गुणवता वाढीला याचा फटका बसत असून मुलांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याचे संकेत मिळत आहेत.

सदरच्या शाळेवरील तत्कालीन शिक्षिका श्रीमती सविता पांडुरंग दौंड यांची आपसी आंतरजिल्हा बदली मुख्य कार्यकारी अधिकारी रायगड जिल्हा परिषद अलिबाग शिक्षण /आस्था जा.क्र.३/५२५१/ आजीब २०१६ दिनांक रोजीचे आदेश ६/८/२०१६ या प्रमाणे बदली झाली तद्नंतर या जागेवर औरंगाबाद जिल्हा परिषद येथून २३/२०१६ -९८६/२८६५ कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद २३ जुलै २०१६ रोजी आपसी आंतरजिल्हा बदलीचे आदेशान्वये श्रीअभिनाथ माणिकराव शिंदे हे १३/८/२०१६ रोजी होण्याचे आदेशान्वये हजर झाले, परंतु २/९/२०१६पासून आजतागायत सदर शिक्षक सतत गैरहजर असल्याने सदरच्या शाळेवरील आंतरजिल्हा बदली करून आलेले शिक्षक गेली चार वर्षे आहेत तरी कोठे? यांचा तपास रोहा शिक्षण विभागाला आहे की नाही ? तसेच सदर शिक्षकाचा सर्व्हिस बुक आहे की नाही? सतत चार वर्षे पेक्षा अधिक काळ गैरहजर राहिल्याने धानकान्हे आदी.वाडी शाळेवर एकच शिक्षक काम करीत होते? याची खबर प्रशासनाला होती की नव्हती? गेली चार वर्षा पेक्षा अधिक काळ झालेला असताना सुद्धा विद्यार्थ्यांच्या झालेल्या शैक्षणिक नुकसानीस जबाबदार कोण? याची मोठी चर्चा रोहा तालुका शिक्षण वर्तुळात ऐकायला मिळत आहे .

धानकान्हे आदिवासी वाडीवरील शाळेतील एकूण पटसंख्या ही ३०ते ३५ आसपास असून या ठिकाणी गेली चार वर्षापेक्षा अधिक काळ एकच शिक्षक हजर आहेत. या शाळेवर विद्यार्थ्यांचा शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता रोहा पंचायत समिती गटशिक्षणाधिकारी यांच्याकडे अनेकदा मागणी केली तरी देखील एक आदिवासी शाळा म्हणून सातत्याने दुर्लक्षित केले जात आहे.राज्यात शिक्षण हक्क कायदा लागू होऊन अनेक वर्षे झाली परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याची मानसिकता अधिकारी वर्गाकडे नसल्याचे या प्रकरणावरून दिसून येत आहे.

शाळा व्यवस्थापन समितीने याबाबत तोंडी तसेच लेखी देखील निवेदने दिली आहेत तरी देखील आमच्या मुलांना शिकविण्याकरिता शिक्षक उपलब्ध होत नाही. परंतु चालू शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांचात शैक्षणिक नुकसान होऊ नये याकरिता या ठिकाणी ताबडतोब नवे शिक्षक मिळावे अशी मागणी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सौ संजना जाधव सह आदी ग्रामस्थांनी केली आहे.

# लायन्स क्लब ऑफ पेण प्राईड तर्फे मास्क व सॅनिटायझरचे वाटप

**दै.रायगड नगरी । पेण**

सध्या पेण तालुक्यात कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वेगाने सुरू आहे. मात्र अश्या संकटात वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी व नर्स हे योध्या सारखे काम करीत आहेत.

सामान्य नागरिकांच्या आरोग्याची दिवस असो वा रात्र काळजी घेणारे व फ्रन्ट लाईनला असलेले वैद्यकीय अधिकारी, डॉक्टर्स, कर्मचारी व नर्स यांच्या आरोग्याच्या तसेच सुरक्षितेच्या उद्देशाने आज प्राथमिक आरोग्य केंद्र कामार्ली येथे लायन्स क्लब ऑफ पेण प्राईडचे प्रेसिटेंट शशिकांत भगत यांच्या पुढाकाराने मोफत मास्क व सॅनेटायझरचे वाटप करण्यात आले.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी मिलिंद पाटील, थवई, लायन्स क्लबचे प्रेसिडेंट शशिकांत भगत, व्हाईस प्रेसिडेंट प्रमोद पाठक, सेक्रेटरी राजेश मुळे, विरेंद्र पटेल, सुदर्शन शेळके, हेमंत भगत, प्रशांत भगत, प्रांजल पाठक, चेतन तांडेल आदी उपस्थित होते.

# नवीन प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी मौजे देवघर हरिहरेश्वर येथील जागा हस्तांतरित

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

श्रीवर्धन तालुक्यातील हरिहरेश्वर येथील नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र इमारतीच्या बांधकामासाठी जमिनीची मागणी होती. याबाबत पालकमंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्तिशः लक्ष घालून संबंधितांना आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश दिले होते.

या पार्श्वभूमीवर मौजे देवघर, ता.श्रीवर्धन येथील गावठाण नं.१/१०१/अ क्षेत्र २-२४-५० हे.आर.या सरकारी खुले गावठाण वहिवाटदार ग्रुप ग्रामपंचायत हरिहरेश्वर या मिळकतीपैकी ०-२२-० हे.आर.ही जमीन ग्रुप ग्रामपंचायत हरिहरेश्वर (देवघर) यांच्याकडून शासनाकडे पूर्नग्रहण करण्यात आली असून ही जमीन जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्याकडे नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र हरिहरेश्वर, ता.श्रीवर्धन करिता पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांच्या निर्देशानुसार हस्तांतरीत करण्याचे आदेश जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी जारी केले आहेत.

# व्यापाऱ्यांकडून जिल्हा सामान्य रुग्णालयाला मदत

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

करोनाच्या संकटात जिल्हा सामान्य रुग्णालयातील रुग्णांसाठी अलिबागमधील व्यापारी उमेश मोरे, दिलीप जैन, सूरजकुमार यादव, कांतीलाल जैन यांनी सामाजिक बांधिलकी जपत २४ पंखे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सुहास माने यांच्याकडे सुपूर्द केले.

यावेळी अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.अनिल फुटाणे, डॉ.अमोल भुसारे, नगरसेवक अनिल चोपडा, रवि थोरात, गणेश मांजरेकर आदी उपस्थित होते.

उमेश मोरे, दिलीप जैन, सूरजकुमार यादव, कांतीलाल जैन हे अलिबागमधील प्रसिध्द व्यापारी आहेत. उद्योग व्यवसाय सांभाळत असताना गरजूंना मदत करण्याचे काम ते करीत आहेत. अनेकांना त्यांच्याकडून मदतीचा हात देण्यात आला आहे. सध्या सर्वत्र करोनाचे सावट आहे. अलिबागमधील जिल्हा रुग्णालयासह अन्य रुग्णालयात करोना रुग्णांवर उपचार करण्यासाठी वैद्यकिय अधिकारी व कर्मचारी प्रामाणिकपणे काम करीत आहेत. या महामारीच्या संकटात जिल्हा सामान्य रुग्णालयाला व्यापाऱ्यांनी केलेली ही मदत निश्चितच कौतुकास पात्र आहे, सर्वांसाठी अनुकरणीय आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## तस्करी करणारे चार आरोपी गजाआड

या प्रकरणी गाडीवर असणारे आरोपी दशरथ लक्ष्मण वालेकर, रा झाप आदिवासी वाडी, हिरामण बेंडु हिलम, रा. कुंभारशेत, अनिल भागू वाघमारे, रा. चावसर पुणे, रमेश अंकुश जाधव रा.वांद्रे, ता मुळशी, यांना ताब्यात घेतले. तसेच त्यांचे ताब्यात असणारे मोटारसायकल क्र . एम एच ०६ वाय २५६४ व एम एच ०६ बी बी ९२५३ या गाड्या देखील ताब्यात घेतल्या, व या गुन्ह्यातील आरोपींविरुद्ध वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत नोंद करून आरोपीना अटक करण्यात आले आहे.

सुधागड तालुक्यात दुर्मीळ प्रजातीचे व करोडे रुपये किमतीचे मांडुळाची तस्करी करणाऱ्यांना यापूर्वी बेड्या ठोकल्या होत्या. तसेच बिबट्याच्या नख्यांची तस्करी करणार्यांना देखील वनविभागाने पकून कारवाई केली होती. त्यामुळे सुधागड तालुका दुर्मीळ वन्यजिव प्राणी व त्यांच्या अवशेषांची तस्करी करणारे केंद्र बनले आहे. यावर शिक्कामोर्तब झाले आहे. या कारवाईनंतर वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी यांचे कौतुक होत आहे.

## महसूल खात्याचे नियम तुडवले जात आहेत पायदळी

रात्रीच्या अंधारात टाकली जात असल्याने याभागात रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत समुद्र सपटीच संरक्षण करणाऱ्या महत्वाच्या मानल्या जाणाऱ्या तिवंरांवर भराव केले जात आहेत. मोठ्या प्रमाणात केल्या जाणाऱ्या भरावांच्या निमित्ताने तिवरांची अनेक वृक्ष उध्वस्त होतांना दिसत आहेत.

## रायगडला ६१ हजार २०० लसींचा पुरवठा : डॉ.किरण पाटील

नागरिकांनी ऑनलाईन पद्धतीने रजिस्ट्रेशन करून लस घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात ४५ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण करण्यासाठी ४५ हजार २०० कोविशिल्ड लसी उपलब्ध झाल्या आहेत. यामधील ७० टक्के लसी या दुसरा डोस घेणाऱ्या नागरिकांसाठी आहेत. ४५ वर्षांवरील काही नागरिकांनी कोवॅक्सिन लसीचा पहिला डोस घेतला आहे, त्यांना दुसऱ्या डोससाठी कोवॅक्सिन लसीची गरज आहे. त्यांच्यासाठी कोवॅक्सिन लसीची मागणी शासनाकडे करण्यात आली असून, लस उपलब्ध झाल्यानंतर त्यांना लसीचा दुसरा डोस देण्यात येणार आहे.

सध्या सर्वत्र कोरोना बाधित रुग्ण सापडत आहेत. कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी नागरिकांनी विनाकारण बाहेर फिरू नये. शक्यतो गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे. सोशल डिस्टसिंगचे पालन करावे, सतत स्वच्छ हात धुवावेत, मास्क वापरावा, गरम पाणी प्यावे, गरम पाण्याचा वाफारा घ्यावा, सर्दी, खोकला, अंगदुखी, ताप, वास न येणे, चव नसणे अशी लक्षणे आढळल्यास त्वरित करुणा चाचणी करून घ्यावी. चाचणीत कोरोना प्रादुर्भाव झाल्याचे निष्पन्न झाल्यास वैद्यकीय अधिकार्यांनी दिलेली औषधे वेळेत घ्यावीत व केलेल्या सूचना पाळाव्यात, असे आवाहन हे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

# विमानतळास दि.बा.पाटील यांचे नाव द्या ; आगरी समाज संघटनेची मागणी

## नाव देण्यासाठी शरद पवारांकडे मांडले गाऱ्हाणे

**दै.रायगड नगरी । पेण**



नवी मुंबईतील ९५ गावांच्या शेतजमिनी कवडीमोल भावाने संपादित करण्याला कडवा विरोध करण्यासाठी तीव्र लढा उभा केला. शेतकरी, कष्टकरी, कामगार आणि स्थानिक भूमिपुत्र यांच्या न्याय हक्कासाठी सतत आंदोलने, मोर्चे, उपोषणे अशा मार्गाचा अवलंब करून लढवय्य प्रतिमा उभी केली. असे प्रकल्पग्रस्तांचे कणखर बाण्याचे लोकनेते स्व. दि.बा.पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळास देण्याची मागणी येथील जनतेने सुरुवातीपासूनच लावून धरली होती. परंतु काही लोकांनी मध्येच स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्याची नवीनच मागणी पुढे आणून अकारण वाद वाढविला आहे. यामुळे समस्त आगरी समाजाच्या भावना दुखावल्या गेल्या आहेत. परस्पर दि.बा. पाटलांचे नाव नाकारल्याने समाजातून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या आहेत. लोकं रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे हे प्रकरण अधिक चिघळू नये म्हणून मविआ सरकारचे निर्माते आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांनी थेट हस्तक्षेप करावा, आणि सिडको संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयांचा फेरविचार करण्यास भाग पाडावे. असे गाऱ्हाणे अखिल भारतीय आगरी सामाजिक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सूर्यकांत पाटील यांनी त्यांना घातले आहे.

आगरी समाजाच्या वतीने पाठविलेल्या पत्रात त्यांनी म्हटले आहे की, स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्त्वाबद्दल आमच्या मनात नितांत आदर आहे. पण आधीच त्यांचे नाव समृध्दी महामार्गाला जाहीर करण्यात आले आहे. आणि नवी मुंबई विमानतळ हे रायगड जिल्ह्यात उभं राहातं आहे. येथील प्रकल्पग्रस्तांचे नेते स्व.दि.बा.पाटील यांचे येथील विकासाच्या जडणघडणीत मोलाचे योगदान राहिले आहे. जनतेवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध त्यांनी प्रदीर्घ संघर्ष केला. म्हणूनच त्यांच्या संदर्भात लोकांच्या भावना गुंतलेल्या आहेत. तर त्यांचे नाव नव्या पिढीला संघर्षमय वाटचालीचे स्मरण करुन देईल. याकरिता त्यांचे नाव विमानतळास देणं संयुक्तिक ठरणार आहे, असे मतही सूर्यकांत पाटील यांनी पत्रात व्यक्त केले आहे. आजपर्यंतचा पूर्वे तिहास पाहता राज्यकर्त्यांना आगरी समाजाबद्दल नेहमीच वावडे वाटत आले आहे. त्यांनी समाजावर सतत अन्याय केला आहे. परंतु आता समाज बऱ्यापैकी जागरूक झाला आहे. हे शासनकर्त्यांनी ध्यानात घ्यावे. आणि समाजाच्या भावनांचा विचार करुन सकारात्मक निर्णय घ्यावा.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांना या नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की, खालीलप्रमाणे महसूल खात्याने त्याप्रमाणे वर्णन केलेली शेतजमीन मिळकतीचे मालक **श्री. अनंत दादू ठाकूर व इतर** रा. चिरनेर, ता.उरण, जि.रायगड यांच्या मालकीची खालीलप्रमाणे वर्णन केलेली

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे – चिरनेर, ता.उरण, जि.रायगड**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.प्रति | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १९३ | २ | ०-५४-८०<br>पो.ख. ०-०४-८० | ६.५६ |

सदर जमिन आमच्या अशिलांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले असून त्या मिळकतीबद्दल कोणाचाही दान, बक्षीस, फरोक्त अगर अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसाच्या आत खालीलप्रमाणे सही करणारा यांच्याकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह आपल्या हरकती नोंदवाव्यात. वरील मुद्यातील कोणाच्याही हरकती न आल्यास सदरहून मिळकत निर्वेध, निर्दोष व बोजारहित असल्याचे गृहीत धरून आमचे अशील सदरहून मिळकतीचा खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणाऱ्या हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**ता. उरण** **सही/-**
**दिनांक : ०७/०५/२०२१** **ॲड. योगेश नामदेव म्हात्रे**
रा. कोप्रोली, ता.उरण, जि.रायगड
मो. ८०९७१०८०६०/९८१९९१०८०८


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

## संक्षिप्त...

### कंटेनरमधून १७ प्रवाशांना बेकायदेशीररित्या वाहतूक केल्याप्रकरणी केली कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

बॉडी कंटेनरमधून १७ पुरुष इसमांना बेकायदेशीररित्या घेवून जात असताना तळोजा वाहतूक चौकी समोर मिळून आल्याने दोघा जणांविरुद्ध तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

चंदनकुमार रामदेव राय (२६ रा.झारखंड) व मुकेशकुमार डागी (रा.झारखंड) या दोघांनी त्यांच्या ताब्यातील बॉडी कंटेनर क्र.एनएल-०१-एबी-६२७८ यामध्ये १७ पुरुष इसमांना बेकायदेशीर घेवून जात असताना तळोजा वाहतूक चौकी समोर तळोजा औद्योगिक वसाहत परिसरात आढळून आल्याने त्यांनी शासनाचे निर्गमित केलेल्या आदेशाचा भंग केला.

तसेच जिवीतास धोकादायक असलेल्या रोगाचा संसर्ग पसरविण्याचा संभव असलेली हयगयीची व घातक कृती करून इतरांचे जिवीत किंवा व्यक्तीगत सुरक्षा धोक्यात आणण्याची कृती केली. त्याचप्रमाणे सरकारी कर्तव्य बजावत असलेल्या कर्मचाऱ्यांशी हुज्जत घातल्याने त्याच्याविरुद्ध भादवी कलम १८८, १८६, २६९, २७०, ३३६ मोटार वाहन कायदा कलम ६६ (१/९२) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

### व्हिसाची मुदत संपलेली असतानाही बेकायदेशीर वास्तव्य करणाऱ्या महिलेविरुद्ध कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

व्हिसाची मुदत संपलेली असतानाही भारतात राहण्याचा कोणताही अनधिकृत परवाना नसतानाही बेकायदेशीररित्या भारतात वास्तव्य करणाऱ्या महिलेविरुद्ध तळोजा पोलिसांनी कारवाई केली आहे.

मीस.ब्युटी खातून, सध्या रा.तळोजा फेज-२, या बांगलादेशी महिला असून तळोजा पोलीस ठाणे हद्दीत तळोजा फेज-२ येथे त्यांची व्हिसा मुदत संपल्यानंतरही भारतात राहण्याचा कोणताही अधिकृत परवाना नसतानाही बेकायदेशीररित्या भारतात वास्तव्य करत असल्याचे आढळून आल्याने त्यांच्याविरुद्ध विदेशी नागरिक कायदा १९४६ चे कलम १४ (ए), १४ (बी), पासपोर्ट कायदा १९६७ चे कलम १२ (सी) प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

# कोरोना लसीकरण- समज आणि गैरसमज

ज्या कोरोना लसीची गेल्या दीड वर्षापासून संपूर्ण जग आतूरतेने वाट पाहत होतं. जी लस तयार करण्यासाठी संपूर्ण जग प्रयत्न करत होते अशी यशस्वी लस सर्वप्रथम भारताने तयार केली. याचा प्रत्येक भारतीयाने अभिमान बाळगला पाहिजे. काल माझ्या शेजारच्या काकांना मी सहज विचारले 'काका तुम्ही कोरोनाची लस घेतली का?' त्यांनी सरळ 'नाही घेतली' असे उत्तर दिले. मी त्यांना विचारले की, अद्याप तुम्ही लस का नाही घेतली? त्यावर ते म्हणाले 'लस घेतल्याने त्रास होतो.बरीच लोक लस घेतल्यानंतर दगावली' त्यांच्या या उत्तराने मला धक्काच बसला.

माझ्या कार्यालयातील सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांनी कोरोनाची लस घेतली आहे. लस घेतल्यानंतर पहिले दोन दिवस साधा ताप, कणकण अंगदूखी ही लक्षणे सगळयांनाच होती. मात्र त्यानंतर आमच्यापैकी कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास झालेला नाही. या उलट कोरोना बद्दलची मनातली भिती ५० टक्के तरी कमी झालेली आहे. लस घेतल्या नंतर कोरोना होणार नाही असे नाही, मात्र चुकून कोरोना झाला तरी लस घेतल्यामुळे कोरोना विषाणू सोबत आपले शरीर लढू शकते. आपण कोरोनाला निश्चितच हरवू हा आत्मविश्वास वाढलेला आहे. हे सांगितले पाहिजे.

कोरोनाच्या दूसऱ्या लाटेचा सामना आपण सध्या करत आहेत. कोरोनाच्या तिसऱ्या लाटेला रोखण्यासाठी लसीकरणाचा वेग महत्वाचा आहे. केंद्र शासनाच्या अदेशानूसार १ मे पासून संपूर्ण राज्यात १८ वर्षावरील सर्वच नागरीकांना लस देण्यात येणार आहे. १८ ते ४४ वयोगटातील लसीकरण कार्यक्रमाचे नियोजन करताना कुठलीही अडचण येणार नाही याची काळजी घ्यावी,या वयोगटातील नागरिकांनी कोविन मोबाईल पवर नोंदणी करावी, कुठेही लसीकरण केंद्रांवर गर्दी करू नये. लसीकरणाबाबत व्यवस्थित व सुस्पष्ट सूचना मिळतील अशा सुचना मा.मुख्यमंत्र्यांनी प्रशासनाला केल्या आहेत. लसीकरणाचा वेग वाढावा त्या सोबतच लसीचे उत्पादनही वाढावे यासाठी केंद्र शासनाच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या जैव तंत्रज्ञान विभागाच्या सहाय्याने आणि मे.भारत बायोटेक इंटरनॅशनल लि., हैद्राबाद या कंपनीकडून कोविड-१९ या साथ रोगाच्या लसीचे उत्पादन तंत्रज्ञान घेऊन महामंडळाच्या परळ, मुंबई येथील जागेत रूपये १५४ कोटी भांडवली खर्चाच्या कोवॅक्सिन लस उत्पादनाचा प्रकल्प सुरु करण्यास मंजूरी दिली आहे.

यापूर्वी फक्त ४५ वर्षावरील नागरीकांना लस दिली जात होती. राज्यात तरुण वर्गाची संख्या मोठी आहे. तरुणवर्गातील मुला मुलींच्या मनात लसीकरणाबद्दल अनेक प्रश्न, गैरजमज आहेत. याबद्दलीच प्रश्न उत्तरे दिली आहेत. प्रश्न- लसीकरणासाठी नोदणी(रजीस्ट्रेशन) कसे करावे? उत्तर-लसीकरणासाठी आपण आरोग्य सेतू ॲप किंवा कोविन पोर्टलवर सुध्दा नोंदणी करु शकतो. यामध्ये आपण आपल्या सोयीनुसार लसीकरणाची तारीख व वेळ ठरवू शकता. प्रश्न- लसीकरणाच्या नोंदणीसाठी कोणकोणत्या कागदपत्रांची आवश्यकता लागेल? उत्तर-लसीकरणाच्या नोंदणीसाठी स्वतःचा पासपोर्ट साईज फोटो व कणतेही एक फोटोआयडी उदा. आधारकार्ड/पॅनकार्ड/वोटरआयडी चालेल.




प्रश्न- लसीकरणाच्यावेळी फोटोआयडी नेणे आवश्यक आहे का? उत्तर-नोंदणीच्यावेळी आपण जो आपला फोटो आयडी दिला होता. तोच फोटो आयडी सोबत न्यावा लागेल. प्रश्न- लसीकरणाचे एकूण किती डोस असतील व ते किती दिवसांच्या अंतरावर घ्यावे लागतील? उत्तर-कोविशिल्ड व कोवॅक्सीन अशा दोन लसी आहेत. दोघांपैकी एक लस घ्यावी लागेल दोघांचेही दोन दोन डोस घेणे आवश्यक आहे. कोविशिल्ड लसीचा पहिला डोस घेतल्या नंतर दूसरा डोस चार ते आठ आठवडयानंतर घ्यावा लागेल. तर कोवॅक्सीन लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर दुसरा डोस चार ते सहा आठवड्यांच्या अंतरावर घ्यावा लागेल. प्रश्न- लसीच्या डोन डोस करीता वेगवेगळया वेळेस नोंदणी करावी लागेल का? उत्तर-नाही. लसीकरणाच्या सुरुवातीला म्हणजेच पहिल्या डोसच्यावेळी नोंदणी केली असल्यास पुन्हा दूसऱ्या डोसच्यावेळी नोंदणी करण्याची आवश्यकता नाही. प्रश्न -कोविशिल्ड व कोवॅक्सीन यापैकी चांगली लस कोणती? उत्तर-वैद्यकीय चाचण्यांमध्ये दोन्ही लसी उपयुक्त असल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यामुळे दोन्ही लस चांगल्या आहेत. प्रश्न- दोन्ही लसींपैकी कोणतीही लस आपल्या मनाने कधीही घेऊ शकतो का? उत्तर-नाही. आपण लसीकरण नोंदणीच्या वेळी जे लसीकरण केंद्र निवडले होते त्या लसीकरण केंद्रावर त्यावेळेस जी लस उपलब्ध असेल तीच लस घ्यावी लागेल. प्रश्न- जे कोरोना बाधीत रुग्ण नुकतेच कोरामुक्त झाले आहेत व कोरोनातून पूर्णपणे बरे झाले आहेत त्यांनी लस घेतली पाहिजे का? उत्तर- जे कोरोना बाधीत रुग्ण नुकतेच कोरामुक्त झाले आहेत व कोरोनातून पूर्णपणे बरे झाले आहेत त्यांनी सुध्दा लस घेतली पाहिजे कारण कोरानातून बरे झालेल्या बऱ्याच व्यक्तींना कोरोनाची पुन्हा लागण झालेली आहे. प्रश्न- लस कोणी घेऊ नये? उत्तर-गर्भवती महिला, बालकांना स्तनपान करणाऱ्या महिला, कोरोना बाधीत रुग्ण किंवा गंभीर आजाराने पीडीत व्यक्ती यांनी लस घेऊ नये. प्रश्न- लसीकरणाचे दोन डोस वेगवेगळया लसीचे घेतले तर चालतील का? पहिला डोस कोविशिल्डचा व दुसरा डोस कोवॅक्सीनचा घेतला तर चालेल का? उत्तर-अजिबात नाही. पहिला डोस ज्या लसीचा घेतला आहे. दूसरा डोस देखील त्याच लसीचा घेणे आवश्यक आहे. प्रश्न - पहिला डोस घेतला आहे परंतु सध्याच्या लसीच्या तुटवडयाअभावी दूसरा डोस घेण्यास विलंब झाल तर ?

उत्तर - तज्ञांच्यामते लसीचा पहिला डोस घेतल्यानंतर न्टीबॉडीज तयार व्हायला २ ते ३ आठवडे लागतात त्यामुळे काहीवेळा लसीचा पहिला डोस घेतलेल्यांना मधल्याकाळात कोरोनाची लागण झाली असल्यास घाबरण्याचे कारण नाही. कारण अशा रुग्णांची लक्षणे सौम्य असतातआणि त्यांच्यापासून इतरांना संसर्गाचा धोकाही कमी असतो. थोडक्यात पहिला डोस तुम्हाला कोरोना पासून ५० टक्के संरक्षण देतो. त्यामुळे विलंब झाला तरी दूसरा डोस हा बूस्टर डोस असल्याने तो घेणे गरजेचे आहे. प्रश्न- लसघेतल्या नंतर सुध्दा शासनाचे नियम पाळावे लागतील का? म्हणजेच मास्क लावणे, सुरक्षित अंतर पाळणे, सतत हात धुणे यासर्व गोष्टींचे पालन करावे लागेल का? उत्तर-हो लसीकरणानंतर सुध्दा शासनाच्या सर्व नियमांचे पालन करणे आवश्यक आहे. मास्क लावणे, सुरक्षित अंतर पाळणे, सतत होत धुणे या सर्व गोष्टी पुर्वी प्रमाणेच पाळाव्या लागतील. प्रश्न- लस घेतल्यानंतर शरीरात न्टीबॉडीज कधी तयार होतील? उत्तर-दोन्ही लसींचे डोस घेतल्यानंतर २ ते ३ आठवड्यांच्या आत शरीरात न्टीबॉडीज तयार होण्यास सुरुवात होते. त्यामुळे लस घेतल्यानंतर कमीतकमी २ ते ३ आठवडे धुम्रपान व मद्यपान करणे टाळावे. प्रश्न- लस घेतल्यानंतर शरीरात कोणती लक्षणे आढळून येतात. उत्तर-ज्या ठिकाणी लस घेतली आहे ती जागा थोडी दुखणार, डोकेदुखी, ताप, अस्वस्थपणा, चक्कर येणे अशी लक्षण दिसू लागतील. लस घेतल्या नंतर ही लक्षणे दिसणे अपेक्षित आहेत त्यामुळे घाबरुन न जाता डॉक्टरांच्या सल्ल्याने औषध घ्यावे. प्रश्न- लस घेतल्यानंतर सुध्दा कोरोना होऊ शकतो का? उत्तर-लस घेतल्यानंतर कोरोना होणार नाही असे नाही लस घेतल्यानंतर सुध्दा कोरोना होऊ शकतो परंतु लस घेतल्यानंतर शरीरात कोरोनाच्या विषाणू सोबत लढण्याची ताकत निर्माण होते व आपले शरीरा कोरोनाशी लढण्यास सक्षम बनते. प्रश्न- लसीची किंमत किती आहे? उत्तर-शासकीय रुग्णालयांमध्ये दोन्ही लसी मोफत दिल्या जात आहेत. खासगी दवाखान्यांमध्ये एका लसीचे किमान २५०/- रुपये द्यावे लागतील.

कोकण विभागात ठाणे, रायगड, रत्नागिरी, पालघर जिल्हयातील जिल्हा रुग्णालयांमध्ये तसेच नवी मुंबईतील वाशी, नेरुळ, ऐरोली रुग्णालयांमध्ये लस देण्यात येईल.

राज्यात लाखाच्या संख्येत दररोज बाधितांची संख्या वाढत असली तरी मोठया संख्येने रुग्ण बरे सुध्दा होत आहेत. वाढत्या रुग्ण संख्येला ऑक्सीजन, औषधे, बेड, साधन सामग्री यांची उपलब्धता करुन देताना शासनावर प्रचंड ताण पडत आहे. कोरोनाचा वाढता प्रदुर्भाव रोखण्यासाठी शासनाने राबविलेले 'ब्रेक दि चेन' हे अभियान यशस्वीकरण्यासाठी 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या मुख्यमंत्री उध्दव ठाकरेंच्या घोष वाक्याचे सर्व जनतेने पालन करुन जबाबदारीने लस घेणे गरजेचे आहे.

**प्रविण रा.डोंगरदिवे**
**माहिती सहाय्यक**
**विभागीय माहिती कार्यालय**
**कोकण विभाग, नवी मुंबई**

## उरण कोरोना सेंटर येथे आयुसीयू सुविधा सुरू करण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

कोरोनाने सर्वत्र कहर माजवला आहे. उरणमध्ये त्याचा प्रसार जोमाने वाढत आहे. अनेक रुग्णांची ऑक्सिजन लेवल कमी होहून मृत्यू मुखी पडले आहेत. अशा वेळी रुग्णांना आयसीयू बेडची खरी गरज आहे. मात्र औद्योगिक दृष्ट्या प्रगत असलेल्या उरण तालुक्यातील कोविड रुग्णालयात एकही आयुसीयू बेड नसल्याने शोकांतिका व्यक्त केली जात असून तालुक्याला कोणी आयुसीयू बेड देते का ? अशी मागणी करण्याची वेळ आली आहे.




उरण तालुका हा औद्योगिक दृष्ट्या प्रगत तालुका म्हणून ओळखला जात आहे. एक - एक प्रकल्प संपूर्ण तालुका दत्तक घेऊ शकतो.एवढा इन्कम सोर्स आहे. तालुका दत्तक सोडा परंतु सद्या परिस्थितीत तालुक्यातील कोविड रुग्णांना खरी गरज आहे ती आयसीयू रुग्णालयाची तालुक्यातील प्रकल्पांनी जर याचा विचार केला तर हे शक्य होऊ शकतो. उरण तालुक्यात मागील वर्षी कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये शासनाने तालुक्यात तीन कोविड सेंटर सुरू केले होते. त्यातील दोन कोविड सेंटर ऑक्सिजन बेडचे सुरू आहे. एक देडिकेटेड कोव्हीड सेंटर ४७ बेडचे सुरू आहेत.

दुसरे जेएनपीटी रुग्णालय ४० बेडचे सुरू आहे.मात्र तिसरे जिल्हाधिकाऱ्यांनी आधिग्रहन केलेले ४० बेडचे २६ ऑक्सिजन आणि ११ आयसीयू बेडचे केअर पाइंट रुग्णालय वापरावीना पडून आहे. हे बंद असलेले रुग्णालय सुरू करण्यासाठी येथील प्रकल्पांची जर पुढाकार घेतला तरी एक एक माणूस मरताना वाचेल. या साठी हे रुग्णालय सुरू करण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडे आग्रही मागणी करण्यात आली आहे.येथे लागणार स्टाफ एमडी डॉक्टर एमबीबीएस डॉक्टर नर्स कर्मचाऱ्यांची नेमणूक केली तर उरण मधील रुग्णांना एक नव संजीवनी मिळेल या साठी शासनाने लवकरात आयसीयू रुग्णालय सुरू करावे अशी मागणी जनतेतून होत आहे.

## कामोठे पोलिसांनी केली फास्ट फुड दुकानावर कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

शासनाच्या आदेशाप्रमाणे आस्थापनाविहित वेळेपेक्षा जास्त वेळ फास्ट फुड चालू ठेवल्याने कामोठे वसाहतीमध्ये दोन जणांविरोधात कामोठे पोलिसांनी कारवाई केली आहे.

विहान चायनीज फास्ट फुड तसेच अलबेक फास्ट फुड या दुकानाच्या चालकांनी शासनाच्या आदेशाप्रमाणे आस्थापना विहित वेळेपेक्षा जास्त वेळ चालू ठेवून केवळ होम डिलेव्हरी करण्याचे आदेश असतानाही त्यांच्या हॉटेल समोर ग्राहकांची गर्दी जमवून खाद्य पदार्थ विक्री करून पनवेल महानगरपालिका तसेच शासनाच्या नियमांच्या आदेशाचे अवहेलना केल्याबद्दल अतुल बोडवे व संदीप लाखन यांच्या विरोधात भादवी कलम १८८, २७० सह राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ (ब) सह महाराष्ट्र कोव्हीड-१९ उपाय योजना सन २०२० चे कलम ११ व साथरोग प्रतिबंध कायदा १८९७ कलम ०३ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

## श्रीवर्धनमध्ये व्यापाऱ्यांकडून तंबाखूजन्य पदार्थांची चढ्या भावाने विक्री

**दै.रायगड नगरी । श्रीवर्धन**

या वर्षीच्या एप्रिल महिन्यापासून कडक निर्बंध लागू करून पुन्हा एकदा लॉकडाऊन जाहीर झाल्यामुळे श्रीवर्धन शहरातील काही व्यापाऱ्यांकडून तंबाखूजन्य पदार्थांची चढ्या भावाने विक्री केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे.

तंबाखू खाणारे किंवा धूम्रपान करणारे यांना ती वस्तू न मिळाल्यास ते कोणत्याही भावाने खरेदी करण्यास तयार होतात. याचाच फायदा शहरातील काही चाणाक्ष व्यापाऱ्यांनी उचलून तंबाखूजन्य पदार्थांची विक्री चढ्या भावाने करण्यास सुरुवात केली आहे.

गेल्या वर्षीच्या लॉकडाऊन मध्ये सुद्धा गायछाप तंबाखूची पुडी तब्बल पन्नास रुपयांना विकली जात होती. त्याचप्रमाणे सिगारेटचे पाकिट पन्नास रुपये जास्त घेऊन विकले जात होते. विडी बंडल देखिल २० रुपये जास्त घेऊन विकले जात होते. त्याचप्रमाणे सुवासिक तंबाखू, गुटखा इत्यादी पदार्थांची विक्री देखील चढ्या भावाने सुरू होती.

आता पुन्हा एकदा लॉकडाऊन जाहीर झाल्यामुळे व्यापाऱ्यांनी हे सर्व पदार्थ चढ्या भावाने विकण्यास सुरुवात केली आहे. जे व्यापारी आपला स्वतःचा आर्थिक फायदा करण्यासाठी अशा प्रकारे चढ्या भावाने कोणत्याही पदार्थांची विक्री करत असतील तर ग्राहकांनी स्थानिक प्रशासना जवळ संपर्क साधण्याची आवश्यकता आहे. अन्न व औषध प्रशासनाने देखील श्रीवर्धन बाजारपेठेत अशाप्रकारे चढ्या भावाने विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करण्याची गरज आहे.


## ग्रामपंचायत कोळखे

ता.पनवेल, जि.रायगड

### जाहीर निविदा

दि.०६/०५/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रामपंचायत कोळखे हद्दीतील ग्रामनिधी योजनेंतर्गत खालील विकासकामे करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. ०७/०५/२०२१ ते १२/०५/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि.१३/०५/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रामपंचायत कोळखे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | इसारा रक्कम १% | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | कोळखे गावातील अंतर्गत ड्रेनेज व चेंबर साफ करणे व दुरुस्ती करणे | २७४५७८/- | २७४५/- | ३ महिने |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रामपंचायत कोळखे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रामपंचायत कोळखे**


## मनाई आदेशाचा भंग करुन रिसॉर्टवर जमलेल्या ३० व्यक्तींवर गुन्हा दाखल

**दै.रायगड नगरी । पनवेल**

करोना विषाणूंचा संसर्ग रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर फिरण्यास तसेच सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यास मनाई करण्यात आली असतानाही पनवेल नेरे मधील आतासा रिसॉर्टवर २५ ते ३० लोक एकत्र जमल्याचे आढळुन आले आहे. त्यामुळे पनवेल तालुका पोलिसांनी या २५ ते ३० व्यक्तींवर लॉकडाऊनच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

करोनाचा कहर दिवसेंदिवस वाढत असल्याने रुग्ण संख्येत देखील प्रचंड वाढ होत आहे. करोनाची साखळी तोडण्यासाठी लोकांनी आपापल्या घरात राहणे गरजेचे आहे. ही बाब लक्षात घेऊन राज्य सरकारने संपुर्ण राज्यात लॉकडाऊन घोषीत करुन संचारबंदी व जमावबंदी लागु केली आहे. तसेच अत्यावश्यक कारणाशिवाय बाहेर फिरण्यास तसेच सार्वजनिक ठिकाणी एकत्र येण्यास मनाई करण्यात आलेली आहे. मात्र त्यानंतर देखील पनवेल तालुक्यातील नेरे येथील आतासा रिसॉर्टमध्ये रिसॉर्टचे मालक आपल्या मित्र मंडळी व कुटुंबासह एकत्र आले होते. त्यामुळे रियाज भाटी यांना भेटण्यासाठी व्यक्तींनी सदर रिसॉर्टमध्ये गर्दी केली होती. याबाबतची माहिती पनवेल तालुका पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी मंगळवारी दुपारी सव्वा दोन वाजता सदर रिसॉर्टमध्ये पोलिसांनी धाव घेतली. यावेळी सदर रिसॉर्टमध्ये कोरोनाचा संसर्ग रोखण्यासाठी कुठल्याही प्रकारच्या उपाययोजना न करता २५ ते ३० व्यक्तींनी गर्दी केल्याचे आढळून आले. यावेळी पोलीस आल्यानंतर त्याठिकाणी काही लोकांनी त्याठिकाणावरुन पळ काढला. दरम्यान, या सर्वांनी शासनाने करोनाच्या पार्श्वभुमीवर लागू केलेल्या अधिसुचनेच्या अटीचे उल्लंघन केल्याचे आढळुन आल्याने पनवेल तालुका पोलिसांनी त्यामुळे रिसॉर्टचा मॅनेजर विवेक दिवेकर, निशील चंद्रकांत राणे, क्लिरन्स कर्वेरो, वसंत सखाराम भोजने, स्वप्निल जाधव, संदेश गुलाब राऊत, व इतर २५ते ३० व्यक्तींविरोधात शासनाच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल केले आहेत.

## बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरणाला उत्तम प्रतिसाद

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

कोरोना रोगाच्या पार्श्वभूमीवर दुसऱ्या लाटेची शक्यता लक्षात घेऊन शासनाने राज्यात मोठ्या प्रमाणावर लसीकरणाला सुरुवात केली असून मुरुड तालुक्यातील बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात लसीकरणाला उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

बोर्ली-मांडला प्राथमिक आरोग्य केंद्रात दि.१२मार्च २०२१पासून ४५ वर्षांवरील सर्वांना कोरोना लसीकरणाला सुरुवात झाली असून दि.३० एप्रिल २०२१ पर्यंत परीसरातील १५२९ जणांनी या लसीकरणाचा लाभ घेतला असल्याची माहिती वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश्री जगताप यांनी दिली.एक ते पाच मे दरम्यान लस उपलब्ध नसल्यामुळे लसीकरण बंद होते तर पाच दिवसांनंतर पुन्हा लस उपलब्ध झाल्याने आज सकाळच्या वेळेत नागरिकांची लगबग दिसून आली.दिवसाला शंभर जण लसीचा लाभ घेत असतात.जस जसा लसीचा पुरवठा होईल तसे लसीकरण जलदगतीने करता येईल असे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश्री जगताप यांनी सांगितले.



# संक्षिप्त...

## सुप्रसिध्द हास्य कलाकार रणजित ठाकूर यांचे कोरोनाने निधन

**दै.रायगड नगरी । उरण**

उरण तालुक्यातील धुतुम गावातील सुप्रसिद्ध हास्य कलाकार रणजित ठाकूर यांचे कोरोनाने दु;खद निधन झाले. मृत्यु समयी त्यांचे वय ३४ वर्षे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे



आगरी झु झु किंग या कला कृतीने समाजात रणजित ठाकूर यांची ओळख होती. त्यांच्या पश्यात पत्नी, एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने हास्य कला क्षेत्रात मोठी हानी झाली आहे. त्यांच्या विनोदाने लोकांची मनोरंजन मोठ्या प्रमाणत होत असे.

## महिलेच्या खुनाचे गूढ उकलण्यासाठी पनवेल शहर पोलिसांसमोर आव्हान

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुक्यातील कुंडेवहाळ गावाच्या हद्दीतील पन-वेल उरण मार्गावरील रेल्वे ट्रॅकच्या बाजूला एका अनोळखी महिलेचा मृतदेह पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेतला. मात्र या खुनाचे गूढ अद्यापही गुलदस्त्यात असल्यामुळे या मृतदेहाची ओळख पटविण्यासाठी पनवेल शहर पोलिसांकडून निरनिराळी युक्ती राबविली जात आहे.

भारतीय रेल्वेने अधिग्रहण केलेल्या जागेत कान्होबा धाब्याच्या विरुद्ध बाजूला पनवेल उरण रेल्वे ट्रॅकच्या बाजूला निर्जन ठिकाणी एका अनोळखी महिलेचे मृतदेह दिनांक ०२ मे २०२१ रोजी सकाळच्या सुमारास दिसून आले, यावेळी मयत महिलेचे वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष असून सदर महिलेला अज्ञात इसमाने जीवे ठार मारून तिचे पाय बांधून एका कापडी गोधडीत गुंडाळून पुरावे नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह टाकून आरोपींनी पलायन केल्याचे पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आले. यावेळी पनवेल शहर पोलिस ठाण्याच्यावतीने तपास सुरू करण्यात आला, मात्र कोणतेही धागेदोरे मागे न ठेवता आरोपीने शिताफीने हे कृत्य केले असल्याचे समोर आले. या मयत महिलेची ओळख पटविण्यासाठी पोलिसांसमोर मोठे आव्हान उभे राहिले आहे. सदर महिलेच्या खूनाबाबत अज्ञात व्यक्ती विरुद्ध भा. द. वि कलम ३०२/२०१ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असला तरी महिलेची ओळख अजूनही पटली नाही. त्यामुळे या मृत महीलेबाबत कोणाला माहिती मिळाली असल्यास त्वरित पनवेल शहर पोलीस ठाणे क्रमांक ०२२-७४५२३३३ या क्रमांकावर संपर्क साधावा तसेच सदर महिलेच्या नातेवाईकाबाबत माहिती दिल्यास त्या इसमाचे नाव गुपित ठेवण्यात येवून योग्य ते बक्षिस देण्यात येईल असे आवाहन शहर पोलीस ठाण्याचे तपास अधिकारी पोलीस निरीक्षक गोपाल कोळी ७९७७०७०३४६, पोउपनि सुनील तरमाळे ८१०८००८१८८ यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पर जिल्ह्यातुन तालुक्यातून लसिकरणासाठी लोक माणगांवात, संचारबंदी नावपुरतीच

## कोव्हिन ॲप २००च्या यादी मुळे नोंदणी करुनही माणगांवकरांना लसिकरणाची समस्या

**दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव**

माणगांव मध्ये खंडीत झालेले लसिकरणास आज प्रारंभ झाला परंतु ऑन लाईन नोंदणी केलेल्यांनाच या ठिकाणी लस मिळणार आहे. साधारणतहा २०० लोकांची यादी कोव्हिन पोर्टल ॲप वरुन प्राप्त झाली आहे. त्याप्रमाणेच लसिकरण होणार आहे. असे येथील व्यवस्थापक राजेश छेडा यांनी सांगितले. त्यामुळे माणगांव मधिल ऑन लाईन नोंदणी केलेल्या अनेकांना आज लस मिळा-लीच नाही. माणगांवच्या लसिकरण केंद्रावर रोहा, नागोठणे, तळा, पेण, पनवेल, नागांव-अलिबाग, शेरढोण, महाड तर काही जण स्वतःची ओळख रायगड वरुन आलो असे सांगत होते. काहीजण पुणे, खारघर, मुंबई येथुन आल्याचे प्रत्यक्ष सांगत होते यांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन केले व लस घेण्यासाठी ही मंडळी माणगांवच्या उतेखोल येथिल जिल्हापरिषदेच्या शाळेत आली होती. यादीत दोनशे जणांची नावे होती. पण आज सगळेच उपस्थित नव्हते मग उपस्थित माणगांवकरांचे लसिकरण का करत नाहीत? असा मुद्दा उपस्थित झाला होता.

यावेळी माणगांवचे शिवसेना शहर प्रमुख अजित तार्लेकर तसेच पंचायत समिती सभापती महेंद्र तेटगुरे यांनी याबाबत माणगांव उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉक्टर प्रदिप इंगोले यांचेशी संपर्क करुन ही गोष्ट त्यांचे लक्षात आणुन



माणगांवकरांसाठी असलेल्या लसिकरण केंद्रावरच माणगांवकरांना लस मिळत नाही, याबाबत नाराजी व्यक्त केली आहे. येथिल लसिकरण केंद्रातील अशा प्रकारचे परिस्थिती मुळे नागरिकांची बाचाबाची व अशांततेचे वातावरण निर्माण होत आहे. याबाबत प्रस्तुत पत्रकार यांनी माणगांवच्या प्रांत प्रशाली दिघावकर यांचेशी संपर्क करुन ही बाब लक्षात आणुन दिली. यावेळी प्रांताधिकारी यांनी येथील परिस्थिती लक्षात घेता संबधितांना सुचना दिल्या पोलिसांना लक्ष देणेस सांगितले व ज्याप्रमाणे कोव्हिन प यादी आली आहे, त्या प्रमाणे सर्वांचे लसिकरण होईल असे सांगितले.

परंतु इतर जिल्ह्यातुन तालुक्यातुन लोक लसिकरणा साठी येथे येत आहेत आणि विशेष म्हणजे सर्वच तालुक्यातुन केंद्रातुन राज्यातुन त्यांचे साठी मंजुर लसिंचा पुरवठा केला जात आहे. तरी सुध्दा आपआपल्या तालुक्यात वा जिल्ह्यात मुंबई पुणे येथे लस मिळु शकते तरीही लसिकरणा साठी येथे यावे लागत आहे. लोकांना भुर्दंड व नाहक अडचणीचा सामना करावा लागत आहे याचे आश्चर्य व्यक्त होत आहे. खासदार सुनिल तटकरे यांचेशी प्रस्तुत प्रतिनीधी यांनी संपर्क करुन याबाबत माणगांकरांसाठी आलेली लस मिळण्यासाठी त्यांना हे कोव्हिन नोंदणी ॲप तालुक्या पुरते तयार केल्यास बाहेरील लोकांची नावे येणार नाहीत. व येथिल लोकांचे लसिकरण सोपे आणि सहज विना अडथळा वा गर्दी न करता पार पडेल अशी विनंती खासदारांना येथिल प्रशासनाचे अधिकारी व नागरिकांचे वतिने केली असता याबाबत आपण केंद्रातील संबंधितांसी बोलत असुन योग्य तो मार्ग काढण्याचा प्रयत्न करीत आहोत परंतु शेवटी हे केंद्राचे हातात आहे असे सांगितले. या संदर्भात जिल्हाधिकारी यांचे व्हिसी (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) वरुन चर्चा चालु असुन ही समस्या सोडविण्याचे दृष्टीकोनातुन प्रयत्न सुरु असल्याचे वृत्त आहे.

लसिकरणाचा हा चाललेला गोंधळ पाहता नागरिकांना मनस्ताप व हेलपाटे सहन करावे लागत आहेत. तसेच दि. ०१ मे २०२१ रोजी पासून १८ वर्षावरील नागरीकांचे लसीकरण करण्याचे शासनाकडून घोषित केलेले असल्यामुळे आणखी मोठ्या संख्येने लोक लसीकरणासाठी बाहेर पडून लसीकरण केंद्रावर गर्दी होत आहे. त्यातच दूसरा डोस घेण्यासाठीही लोक येत आहेत परंतु यापैकी बरेच लोकांना लस मिळाली आहे. लसीकरण केंद्रावर नागरिकांना आरोग्य सुरक्षेच्या दृष्टीने लसीकरण करताना समस्या निर्माण होवू नयेत व लसीकरण मोहीम चांगल्या प्रकारे पार पाडावी तसेच लसीकरण केंद्रावर होणाऱ्या गर्दीमुळे करोना विषाणूच्या प्रादूर्भाव होण्याची शक्यता विचारात घेता लसीकरण केंद्राच्या २०० मीटर परिसरामध्ये सीआरपीसी कलम १४४ नुसार संचारबंदी आदेश जारी केले आहेत अशा परिस्थितीत जिल्ह्याचे बाहेरुन लोक लसिकरणासाठी तालुक्यात येतात मग संसर्गाचे काय ? असा सवाल ऐरणीवर आला आहे.

## लग्न समारंभास शासकीय नियमापेक्षा अधिक लोक ; तालुका पोलिसांची कारवाई

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तालुका पोलीस स्टेशन हद्दीतील करंबेळी येथील एका लग्न कार्यालयात सुद्धा अधिक लोक जमल्याने तसेच तालुक्यातील बेलवली गाव येथेही अशाच प्रकारे लग्न सोहळ्यात लोक जमविल्याप्रकरणी पनवेल तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

कोविड १९ या संसर्ग जन्य आजाराचा प्रसार होऊ नये दिवसागणिक वाढणारी रुग्ण संख्या आटोक्यात यावी या करिता महाराष्ट्र शासनाने लॉकडाऊन जाहीर करण्यात आला आहे. करंबेळी येथे लग्न कार्यक्रमासाठी नागरिक जमवून शासकीय आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी ९ जणांविरोधात तालुका पोलिसांनी कारवाई केली आहे.

तसेच बेलवली येथे सुद्धा अशाच प्रकारे मास्क न परिधान तसेच सोशल डिस्टन्सिंगचे पालन न करता विवाह सोहळ्यास उपस्थित राहिल्याप्रकरणी ९ जणांविरोधात कारवाई करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी शासकीय नियमांचे पालन करूनच लग्न सोहळा पार पाडावा, असे आवाहन वपोनि रवींद्र दौंडकर यांनी केले आहे.

## कोविड रुग्णांच्या मानसिक समुपदेशनासाठी १३० पेक्षा अधिक स्वयंसेवक सज्ञ

### जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यात लवकरच सुरु होणार कोविड हेल्पलाईन

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कोविड-१९ या आजाराविषयी समाजामध्ये असणारी भीती आणि सोशल मीडियामुळे निर्माण झालेले गैरसमज याला आळा बसावा, कोविड रुग्णांचे मानसिक समुपदेशन व्हावे, याकरिता जिल्हाधिकारी निधी चौधरी यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील कोविड हेल्पलाईन करिता १३० पेक्षा अधिक स्वयंसेवकांचे काल (दि.५ मे रोजी ) जिल्हाधिकारी कार्यालयातील राजस्व सभागृहात ऑनलाईन प्रशिक्षण संपन्न झाले.

या प्रशिक्षण कार्यक्रमास जिल्हाधिकारी श्रीम. निधी चौधरी, उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने,ज्येष्ठ मानसोपचारतज्ञ डॉ.अनिल डोंगरे आणि जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल भुसारे, ड.पल्लवी तुळपुळे, प्रभाकर नाईक, सुशील साईकर यांच्यासह अन्य कार्यालयीन कर्मचाऱ्यांची प्रत्यक्ष उपस्थिती होती तर जवळपास १५० पेक्षा अधिक लोक व्हिडिओ कॉनफरन्सिंद्वारे ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते.

यावेळी जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी अशा प्रकारच्या प्रशिक्षणाची गरज, लोकांमध्ये



कोविडबाबत असलेली संभ्रमावस्था, रुग्णांची वाढणारी संख्या याचा विचार करता लोकांनी लोकांसाठी लोकांमार्फत या गोष्टींची चर्चा करून मानसिक स्वास्थ्य राखण्यासाठी हेल्पलाईन असणे का गरजेचे आहे, त्यामध्ये समुपदेशकाची असणारी भूमिका आणि त्याचे महत्व पटवून दिले. जिल्हा मानसोपचार तज्ञ डॉ.अमोल भुसारे यांनी समुपदेशकामध्ये आवश्यक असणारे गुण, करोना रुग्ण आणि नातेवाईक यांचे समुपदेशन कसे करावे, कोणत्या गोष्टी टाळाव्यात, करोना हा आजार शरीरापेक्षा मानसिक नुकसान करून शरीरातील प्रतिकारशक्तीवर कसा परिणाम करतो आणि त्याचे गंभीर परिणाम कोणते, याविषयी विस्तृत माहिती दिली. तसेच मानसिक समुपदेशन केल्यास अशा रुग्णांमध्ये सकारात्मक बदल घडून त्यांच्यामधील प्रतिकारशक्तीत वाढ होत असताना दिसून आलेले आहे. त्यामुळेच कोविड हेल्पलाईनद्वारे उपचार घेत असणाऱ्या आणि घरी होम क्वॉरंटाइन किंवा आयसोलेशनमध्ये असणाऱ्या अशा व्यक्तींचे योग्य ते समुपदेशन करून करोना आजाराला आळा घालू शकतो, असा विश्वास डॉ.भुसारे यांनी यावेळी व्यक्त केला.

ज्येष्ठ मानसोपचार तज्ञ डॉ.अनिल डोंगरे यांनी प्लाजमा थेरपी त्यासोबत रक्तदान, करोना लस, त्याचे लाभ आणि याबाबत अस-लेली नियमावली, या विषयांची प्रशिक्षणार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सामाजिक कार्यकर्ते श्री. सुशील साईकर यांनी केले तर उप जिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## सुधागडातील आदिवासी कातकरी वाड्या तहानलेल्या ; घोटभर पाण्यासाठी रखरखत्या उन्हात फरफट

**दै.रायगड नगरी । पाली/बेणसे**

पाली सुधागड सह जिल्ह्यातील आदिवासी वाड्यापाड्यात डोंगरदऱ्या खोऱ्यात, दुर्गम डोंगराळ भागात वास्तव्यास असलेल्या आदिवासी कातकरी बांधवांची पिण्याच्या पाण्यासाठी कोसोदूर वणवण भटकंती होत आहे. सुधागडातील आदिवासी कातकरी वाड्या तहानलेल्या, दांड कातकरवाडीतील लहानग्यांसह वृद्ध महिलांची घोटभर पाण्यासाठी रखरखत्या उन्हात फरफट होत असल्याचे चित्र दिसून येतंय.



येथील माया पवार यांनी सांगितले की मला या गावात १५ वर्ष झाले, मात्र अजूनही या गावात आवश्यक त्या सुधारणा झाल्या नाहीत. पाण्यासाठी आम्हाला कोसोदूर पायी चालत जावे लागत आहे, इथली बोरिंग मोडले, नळाला पाणी नाही, म्हणून पाण्यासाठी आमचे हाल होतात, शासनाने पाणी समस्येवर तोडगा काढावा. अस्मिता वारे या सहा वर्षाच्या मुलीने सांगितले की पाण्यासाठी मला रोज डोक्यावर हंडा घेऊन चढ उतार करावा लागतो, खूप त्रास होतो असे सांगितले. उन्हाळ्याच्या दिवसात उद्भवणाऱ्या भीषण पाणी टंचाईवर मात करणेकरिता गावोगावी नळ पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून लाखोंचा निधी खर्चून जलसाठवण टाक्या बांधण्यात आल्या आहेत.

सदर योजनेच्या माध्यमातून पाईपलाईनद्वारे मुबलक पाणी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जातोय. मात्र या टाक्या देखील कोरड्या पडल्या आहेत, येथील नळांना देखील पाणी येत नाहीये, त्यामुळे घोटभर पाण्यासाठी आदिवासी वाडीतील अबाल वृद्ध, लहानग्या मुली मुले , तरुण तरुणी यांना कोसोदूर वणवण भटकंती करावे लागत आहे. आदिवासी बांधव पाण्यासाठी जवळ पासच्या फार्म हाऊस च्या मालकांवर अवलंबून राहत आहेत, त्यांनी दिलेल्या पाण्यावर त्यांची तहान भागवावी लागते हे दुर्दैव्य, आदिवासी बांधवांच्या विकासासाठी शासन कोट्यवधींच्या निधीची उधळण करीत असते, मात्र पिण्याच्या पाण्याची समस्या जर वर्षांनुवर्षं सुटत नसेल तर नेमका विकास तरी कुणाचा व कुठला होतोय असा प्रश्न यानिमित्ताने उपस्थित राहत आहे.

## कोलाड पुई नजिक खोदून ठेवलेल्या मोरीच्या खड्ड्यामुळे आठवड्यात चार अपघात

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

मुंबई-गोवा महामार्ग १७ वरील कोलाड पुई गावा नजिक महामार्गाच्या चौपदरीकरनाच्या कामासाठी गेली एक वर्षा पासुन खोदून ठेवलेली मोरीच्या खड्ड्याजवळ साधी उपाय योजना म्हणून रस्त्यात ठेवण्यात आलेल्या प्लास्टिकच्या डीवाईडरमुळे रस्ता अधिकच अरुंद झाल्यामुळे दिवसेंदिवस या जागेवर अपघाताची मालिका सुरुच असुन चक्क एकाच आठवड्यात एकच जागेवर चार विचित्र आपघात झालेले सर्वत्र एकच खळबळ उडाली असून या ठिकाणी अपघाताचा अधिक धोका वाढल्याचे संकेत मिळत असून एका ट्रॅव्हल गाडीने टुव्हीलर स्वारला धडक दिल्याने टुव्हीलर स्वार जब्बर जखमी झाल्याचे संकेत मिळाले आहे.

सदर या विषयी सविस्तर वृत्त असे की बुधवार दि.५/५/२०२१ रोजी रात्री १०.२० वाजण्याच्या सुमारास खांब कडून कोलाडकडे जाणाऱ्या टुव्हीलर गाडीला पाठीमागून येणाऱ्या ट्रॅव्हल गाडीने धडक दिल्याने टुव्हीलर स्वार रस्त्यावर पडून जखमी झाला असून त्याच्या हाताला जखम झाली आहे. परंतु ट्रॅव्हल गाडीवाला येथे कोणही नसल्याचा फायदा घेत तो पसार झाला असुन त्याच्या गाडीचा नंबर ही मिळाला नाही.

सदरच्या मार्गावर काही दिवसांपूर्वीच तीन अप-घात झाले आहेत.तर खोदून ठेवलेल्या रस्त्यामुळे व या बाजूला रस्त्यात ठेवलेल्या डिव्हाडरमुळे रस्ता



अरुंद झाला असल्यामुळे हा चौथा अपघात झाला आहे.परंतु चारही अपघातात सुदैवाने कोणतीही जीवित हानी झाली नाही.तदनंतर ही संबंधित बांधकाम खाते जणू डोळ्याला पट्टी बांधून मोठा अपघात होऊन कोणाचा तरी नाहक बळी जाण्याची वाट पाहत बसले असल्याचे प्रवाशी वर्गातून बोलले जात आहे.

### जाहीर केलेल्या लसीकरण पत्रकात चूक, जेष्ठ नागरिकांना त्रास

## पुन्हा अशी चूक होणार नाही याची काळजी घ्यावी : प्रितम म्हात्रे

**दै.रायगड नगरी । पनवेल**

६ मे २०२१ रोजी कोवी शिल्ड लस पनवेल महानगरपालिकेच्या लसीकरण केंद्रावर उपलब्ध होणार आहे याकरिता पनवेल महानगरपालिकेकडून ५ तारखेला जाहीर केलेल्या लसीकरणाच्या पत्रकामुळे जेष्ठ नागरिक टोकन मिळविण्यासाठी पहाटे ५ वाजले पासून लाईन लावून उभे राहिले. पालिका कर्मचारी ९ नंतर येत असतात. त्यामुळे जागेवर सूचना फलक नसल्याकारणाने संभ्रम निर्माण झाला. ह्यामुळे जेष्ठ नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. पनवेल महानगरपालिकेकडून एक पत्रक मराठी आणि इंग्रजीमध्ये जारी करण्यात आले.

लोकांच्या माहितीसाठी, परंतु त्यामध्ये



UPHC- 2 चा पत्ता मराठी पत्रकामध्ये ज्येष्ठ नागरिक सभागृह पनवेल आणि इंग्रजी पत्रकामध्ये अभिदीप बिल्डिंग, कोळीवाडा येथे असे दोन वेगवेगळे पत्ते देण्यात आले. त्यामुळे नागरिकांनी अगदी पहाटेपासून ज्येष्ठ नागरिक संघ येथे गर्दी केली. पालिकेचे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यांच्याकडे पहाटे तशी तक्रार आल्यावरती त्वरित त्यांच्या स्वयंसेवकांनी तेथे जाऊन नागरिकांना योग्य मार्गदर्शन केले आणि कोळीवाडा येथे लसीकरण सुरू होणार आहे असे सांगितले.

सदरची चूक ही पनवेल महापालिकेकडून घडली आहे. आपल्याकडे कामाचा त्रास कमी मनुष्यबळा अभावी जास्त होत आहे. परंतु ही अशा प्रकारचा चूकिमुळे नागरिकांना विनाकारण त्रास होत आहे आणि अशा परिस्थितीत सदर विषयात गंभीरतेने लक्ष देऊन पुन्हा अशी चूक होणार नाही याची काळजी घ्यावी. असे विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे यानी आयुक्तांना कळविले आहे.

## गोखले शाळेत कैद्यांसाठी विलगीकरण केंद्र नको : परेश ठाकूर

**दै.रायगड नगरी । पनवेल**

नागरिकांना होणाऱ्या मनस्तापाचा विचार करून खारघरमधील गोखले शाळेत कैद्यांसाठी विलगीकरण केंद्राला परवानगी देऊ नये, अशी मागणी सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्त सुधाकर देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

खारघर सेक्टर १२ मधील गोखले शाळेला कैद्यांसाठी विलगीकरण केंद्राला परवानगी न देण्याबाबत नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी सभागृहनेते परेश ठाकूर यांना पत्र दिले होते. त्या अनुषंगाने सभागृहनेते परेश ठाकूर यांनी आयुक्तांना कार्यवाहीसाठी निवेदन दिले आहे. त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे कि, मागील वर्षी गोखले शाळेमध्ये कैद्यांसाठी विलगीकरण केंद्र सुरू केले होते. त्यावेळी येथील स्थानिक नागरिकांना अतिशय



मनस्ताप सहन करावा लागला होता. कैद्यांना भेटायला येणारे नातेवाईक, कैद्यांना येथे आणून सोडून जाणारे पोलीस कर्मचारी, कायदेशीर सल्ला देणारे वकील या सर्वांची होणारी गर्दी व त्यांच्या वाहन पार्किंगमुळे होणारा वाहतूक अडथळा, या सर्व कारणांमुळे येथे नेहमीच छोटेमोठे वाद झालेले आहेत. या सर्वांचा येथील नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागला आहे. मागच्या वेळची स्थिती वेगळी असल्याने नागरिकांकडून सहकार्य झाले केले होते, परंतु या वेळची परिस्थिती वेगळी आहे.

मागील एक महिन्यापासून कोविड बाधितांची संख्या अतिशय भयावह आहे. त्यात शाळा ही गर्दीच्या व मध्यवर्ती वसाह-तीत स्थित आहे परिसरातील वाढत्या कोविड रुग्णांच्या पार्श्वभूमीवर संसर्गात भर पडण्याची भीती नागरिकांमध्ये आहे. या विलगीकरण केंद्रात छोटेमोठे कैदी ठेवले जातात. भविष्यात येथे गंभीर घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.या विषयाचा गांभीर्याने विचार करून गोखले शाळेत कैद्यांसाठी विलगीकरण केंद्र सुरु करू नये, असे असे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी निवेदनात नमूद केले आहे.